महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ५३ वा | दिनांक : १८/११/२०२४ | वार : सोमवार

## मोदींच्या राज्यात केवळ अदाणी सेफ, प्रियांका गांधींचा गडचिरोलीतून घणाघात



**गडचिरोली** : सरकार जनतेला उत्तरदायी असते, पण भाजपने मागील १० वर्षांपासून ही परंपरा मोडीत काढली आहे. एक है तो सेफ है च्या घोषणा दिल्या जातात, पण मोदींच्या राज्यात केवळ अदाणी हेच सेफ आहेत, अशी टीका काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी केली. अडीच वर्षांत लाडकी बहीण दिसली नाही, पण निवडणुकीच्या तोंडावर बहिणींची आठवण झाल्याचे प्रियांका गांधी म्हणाल्या. महाराष्ट्रात तरुणांच्या सर्वाधिक आत्महत्या होत असल्याचा दावा प्रियांका गांधी यांनी केला. त्या गडचिरोली येथे आयोजित सभेत बोलत होत्या.

प्रियांका गांधी म्हणाल्या, भाजपचे नेते शिवाजी महाराजांचे नाव घेऊन मोठमोठ्या बाता करतात. तसेच शिवाजी महाराजांचा अपमान करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ७ वर्षांपूर्वी अरबी समुद्रात शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे उद्‌घाटन केले होते. परंतु, अद्याप काम सुरू केले नाही. भ्रष्टाचारामुळे सिंधुदुर्गातील शिवाजी महाराजांचा पुतळा देखील कोसळला. एक है तो सेफ अशा घोषणा दिल्या जात आहे. मोदींच्या राज्यात केवळ अदाणी हेच सेफ आहेत. भाजप सरकारच्या काळात शेतकरी, मजूर, महिला आणि उद्योग सुरक्षित नाहीत. केवळ पोकळ घोषणा केल्या जातात. निवडणुकीनंतर काहीही होत नाही, असा घणाघात प्रियांका गांधी यांनी केला.

काँग्रेसने इतर राज्यात दिलेली गॅरंटी पूर्ण केली काँग्रेस सरकारने इतर राज्यांत गॅरंटी दिली होती. कर्नाटक, तेलंगणा, हिमाचल प्रदेश मध्ये दिलेली गॅरंटी निवडणुकीच्या दुसऱ्या दिवशी पूर्ण केली. निवडणुका जवळ आल्यावर मुख्य मुद्द्यांवरून जनतेचे लक्ष विचलित केले जाते. जाती, धर्माच्या आधारावर जनतेचे लक्ष विचलित केले जाते. सरकार जनतेला उत्तरदायी असते, पण भाजपने मागील १० वर्षांपासून ही परंपरा मोडीत काढली आहे.

गेल्या १० वर्षांत महागाई प्रचंड वाढली आहे. महागाईमुळे लोक सण साजरे करू शकत नाहीत. जीएसटीमुळे छोटे दुकानदार, व्यावसायिक त्रस्त झाले आहेत. सरकारी परीक्षांमध्ये घोटाळे होत आहेत. आज महाराष्ट्रात अडीच लाख पदे रिक्त असून ते भरले नाहीत. महाराष्ट्रात तरुणांच्या सर्वाधिक आत्महत्या होत असल्याचा दावा प्रियांका गांधी यांनी केला. मागील अडीच वर्षांत महायुतीने काहीही केले नाही. लाडकी बहीण योजना निवडणुकीच्या तोंडावर आणली. जनता टॅक्सवर टॅक्स भरत आहेत, पण उद्योगपतींचे १६ लाख कोटींचे कर्ज माफ केले, पण शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नाही, असे प्रियांका गांधी म्हणाल्या.

युपीएच्या काळात ताडोबा अभयारण्याला मायनिंगपासून वाचवले होते. त्या आलेल्या प्रस्तावाला नाकारले होते. मोदी सरकाने 2020 ने ४१ कोळसा खाणींची प्रक्रिया सुरू केली होती. महाविकास आघाडीने त्यावर ब्रेक आणला होता. पण आज अशा गोष्टींवर कोणतेही बंधन नाही. तुमच्या जमिनी खाणीसारख्या गोष्टींसाठी हडप केल्या जात आहेत. अदाणीसारख्या उद्योगपतींसाठी योजना आणल्या जात आहेत. पाणी, डोंगर, जंगल यांचे संरक्षण करणे आवश्यक आहे, अन्यथा पृथ्वी नष्ट होईल. आज पेसासारखे कायदे कमकुवत केले जात असल्याचा दावा प्रियांका गांधी यांनी केला.

भारताच्या संस्कृतीत आणि राजकारणात गडचिरोलीचे वेगळे महत्व आहे. संविधानाचा पाय रचला आहे. समानता आणि एकता येथून आले आहेत. येथील संतांनी नेहमीच एकतेचा संदेश दिला. हा देश एक राहिला, तरच आपण पुढे जाऊ शकतो. काँग्रेस सरकारने महाराष्ट्रात कधीही भेदभाव केला नाही. पण आज महाराष्ट्रासोबत भेदभाव होत आहे. महाराष्ट्रात येणारे मोठमोठे उद्योग बाहेर नेले जात आहे. सेमी कंटक्टर, एअर बस, सॅफ्रेन यांसारखे मोठमोठे प्रकल्प गुजरातला गेले. ६ हजारांपेक्षा जास्त कंपन्या बंद पडल्या आहेत, असेही प्रियांका गांधी म्हणाल्या.

महायुतीच्या महापापांना महाराष्ट्राच्या पावण भूमीत गाडायचे आहे. महाराष्ट्रातील २ लाख ५३ हजार महिला व तरुणी बेपत्ता आहेत. शिंदे-फडणवीस सरकार महिलांचे संरक्षण करू शकत नाही. राज्यातील ७ लाख कोटींचे उद्योग आणि गुंतवणूक गुजरातला पळवले जात आहे. ५० लाख तरुणांचा रोजगार हिरावून घेण्याचे काम महायुती सरकारने केले, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली.

सत्तेच्या लालसेपायी पक्ष फोडणारे, चिन्ह पळवणाऱ्यांना धडा शिकवायचा आहे. हे गरिबांचे सरकार असल्याचे म्हणत आहेत, पण ५० कोटीमध्ये आमदार खरेदी करून महिलांना दीड हजार देतात. पहिले दीड हजार दिल्यानंतर त्याचदिवशी तेल ५० रुपयांनी महाग केले. अशाप्रकारे प्रत्येक दीड हजाराला वीज बील ३३ टक्क्यांनी महाग केले. १३० रुपयांची तुरीची डाळ १५० रुपये केली. एका खिशात टाकायचे आणि दुसऱ्या खिशातून काढायचे, असा हा प्रकार सुरू आहे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यास महिलांना महिन्याला ३ हजार रुपये देण्याचा निर्णय घेतल्याचेही विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.

## ज्यांचे हात स्वच्छ आहेत, त्याला कोणाच्या बापाची भीती नसते : शरद पवारांचा बबनराव शिंदे यांच्यावर हल्लाबोल

**सोलापूर** : राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांची सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी येथे महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी राज्य सरकार व केंद्र सरकारवर टीका केली आहे. ज्यांचे हात स्वच्छ आहेत, त्याला कोणाच्या बापाला घाबरायची गरज नसते, अशी टीका पवारांनी केली आहे.

सभेत बोलताना शरद पवार म्हणाले, मला देखील ईडीची नोटीस आली होती. मी राज्य सरकारी बँकेचे पैसे काढल्याचे सांगण्यात आले होते. पण मी राज्य सहकारी बँकेचा सभासद देखील नव्हतो, तरी मला नोटीस आली. मी ईडीच्या कार्यालयाच्या जवळ गेलो त्यानंतर, अधिकारी आणि पोलीस प्रशासन म्हणले आमची चूक झाली. त्यांनी मला हात जोडले, असे शरद पवार यांनी सांगितले.

माढा येथील आमदार बबनदादा शिंदे यांना माझ्या खासदारकीचा निधी सुद्धा विश्वासवर खर्च करायचे अधिकार दिले होते. पण राज्यात सरकार बदलले, आपला पक्ष फुटला त्यावेळी हा माढ्याचा गडी कुठे गेला कळलेच नाही. मी विचारले तेव्हा ईडीची भीती असल्याचे सांगितले. संकट आल्यावर ज्याचे हात स्वच्छ आहेत त्याला कोणाच्या बापाची भीती नाही, अशी टीका पवारांनी केली.

पुढे पवार म्हणाले, निवडणुका लागल्यावर हे आमदार बबनदादा शिंदे परत माझ्याकडे आले. चुकले म्हणाले. मी पण म्हणलो, चुका पोटात घेऊ, संधी देऊ. त्यांनी तिकीट मागायला आलो असल्याचे सांगितले. तेव्हा मी त्यांना सांगितले आता नव्या उमेदवाराला संधी दिली पाहिजे. त्यांच्या डोक्यात नवीन म्हणजे त्यांचा लेक वाटला, असा टोला शरद पवारांनी बबनदादा शिंदे यांना लगावला. ४० वर्ष मी तुम्हाला मदत केली. तुमच्या कामात लक्ष घालण्याची तयारी मी ठेवली. सीना माढा सिंचन योजनेसला निधी दिला. तुमच्या कारखान्याला मी मदत केल्याचेही यावेळी पवारांनी सांगितले.

शरद पवार पुढे म्हणाले, दोन वर्षात महाराष्ट्रात ६७ हजार ३८१ महिलांवर अत्याचार झाले आहेत. म्हणजेच दर तासाला पाच महिलांवर या महाराष्ट्रात अत्याचार होत आहेत. महाराष्ट्रातील ६४ हजार महिला आणि लेकी बेपत्ता आहेत. शिंदे-फडणवीस अशा राज्यकर्त्यांना सत्तेत बसायचा अधिकार नाही, असा हल्लाबोल शरद पवारांनी महायुती सरकारवर केला आहे.

राज्यात बेरोजगारी देखील वाढली आहे. ६२ लाख मुळे राज्यात बेरोजगार आहेत.हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे शरद पवार म्हणाले. मोदींनी उद्योगपतींचे १६००० कोटींचे कर्ज माफ केले. मात्र, शेतकऱ्यांचे पाच ते दहा हजारांचे कर्ज माफ केले नाही. या सरकारला शेतकऱ्यांबाबत आस्था नसल्याचे शरद पवार म्हणाले.

## गुहाघरमध्ये वंचितच्या जिल्हाध्यक्षावर जीवघेणा हल्ला

**गुहाघर** : विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला दोन दिवस बाकी असताना रत्नागिरीतून धक्कादायक घटना समोर आली आहे. गुहाघरमध्ये वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्षावर प्राणघातक हल्ला झाल्याचा प्रकार समोर आला आहे. हॉटेलमध्ये जेवत असताना तिघा अज्ञातांनी त्यांच्यावर धारदार शस्त्राने सपासप वार केले. या हल्ल्यात वंचितचे जिल्हाध्यक्ष विकास उर्फ जाधव यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

गुहागर तालुक्यातील नरवण फाटा येथील एका हॉटेलमध्ये ही घटना घडली. वंचितचे जिल्हाध्यक्ष विकास उर्फ आण्णा जाधव हे हॉटेलमध्ये जेवण करत होते. यावेळी तिघे अज्ञात दुचाकीवरून हॉटेलमध्ये आले. आण्णा जाधव जेवण करत असतानाच तिघांनी त्यांच्यावर धारदार शस्त्राने सपासप वार केले. या हल्ल्यात आण्णा जाधव बचावले. मात्र, त्यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे. यानंतर हल्लेखोरांनी आण्णा जाधव यांच्या हॉटेलबाहेर उभ्या असलेल्या कारची देखील तोडफोड केली.

आण्णा जाधव यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. प्रचार संपण्याच्या दोन दिवस घडलेल्या या घटनेमुळे गुहागर तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. हा हल्ला वैयक्तिक कारणातून, आपापसातील वादातून किंवा राजकीय वैमस्यातून करण्यात आला? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू असून त्यांचा शोध लागल्यावरच हल्ल्यामागील कारण स्पष्ट होणार आहे.

राज्यात विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. दोन दिवसांत प्रचाराच्या तोफा थंडावणार असून २० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. त्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी मतदानाचा निकाल समोर येणार आहे. यंदाच्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे विशेष लक्ष लागलेले आहे. कारण राज्यात गेल्या काही वर्षांमध्ये अनेक मोठमोठ्या राजकीय घडामोडी घडल्या आहेत. या घडामोडींनंतर सर्वसामान्य जनता कोणाला निवडून आणते? याकडे सर्वांचं लक्ष लागलेले आहे. यंदाच्या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीत थेट लढत होत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १८ नोव्हेंबर २०२४


## निवडणुक प्रचारात विकासा पेक्षा भावनिक मुद्द्यांना आले महत्व

**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड सोयगाव विधानसभा मतदारसंघांत चौरंगी लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे.विकासा पेक्षा जात धर्म, भौगोलिक अस्मिता, परिवारवाद आदी भावनिक मुद्द्यांना अधिक महत्व या निवडणूक प्रचारात ठळकपणे समोर आले आहे.

तालुक्यात समृध्द गौताळा अभयारण्य, अशिया खंडातील सर्वात प्राचीन असलेली पितळखोरे लेणी, तेराव्या शतकातील थापला लेणी, ऐतिहासिक किल्ले अंतूर, पेडकाकिल्ला, लोंझागड, सुवर्णपालेश्वर, करंजखेड येथील भोईदेव, शेखमारु बाबा, भैरवनाथ देवस्थान, कालीमठ मंदिर, आदी ऐतिहासिक, धार्मिक, पर्यटनस्थळे असतांना त्यांच्या विकासा बाबत आता पर्यंत कोणी ही फारसे लक्ष दिले नाही. आणि आता प्रचार सभांतून कोणी बोलत नाही. शिवाय मतदार संघांतील ग्रामीण रस्त्यांची झालेली दुरावस्था व रेंगाळलेली कामे, पीक विमा, ऊसतोडणी मजूरांची स्थलांतर, शेतकर्यांचे प्रश्न, मका, लसुण अद्रक संशोधन व प्रक्रिया प्रकल्प व उद्योग, समृध्द पर्यटनाची उपेक्षा, बेरोजगारी, आदिवासींचे वनहक्क, कोळी समाजाच्या जातप्रमाणपत्रा साठी येणाऱ्या अडचणी, शिक्षकां अभावी प्राथमिक शिक्षणाची होत असलेली हेळसांड, वन्यजीवां च्या उपद्रवाने शेतमाला चे होणारे नुकसान, बिबट्या कडून माणसां वरती झालेले हल्ले, गौणखनिज तस्करी, बहुचर्चित गुजरदरी जलसिंचन प्रकल्प, उच्च शिक्षणाच्या असुविधा, प्रा. आरोग्य केंद्रांचा कारभार, जलजिवन मिशन ची रेंगाळलेली कामे, मनरेगा अंतर्गत रेंगाळलेल्या संचिका, वीज वितरण चा बेभरवशाचा कारभार, कन्नड शहरा जवळ मंजूर होऊण ही परत गुंडाळलेली एमआयडीसी, कन्नड सहकारी साखर कारखाना, पिशोर चा हिराजीबाबा साखर कारखान्याचे झालेले खाजगीकरण, व कामगारांच्या समस्या, अशा अनेक समस्यांचा डोंगर तालुक्या समोर असताना, विधानसभा निवडणूक प्रचार मात्र जात धर्म, भौगोलिक अस्मिता, पारिवारीक संघर्ष, या भोवतीच फिरताना दिसत आहे. जमिनी वरील प्रचार दौरे, सभा धुमाळी सोबतच सोशल मिडीयातील प्रचार शिगेला पोहचला आहे. तालुक्या च्या सर्वांगीण विकासा ला भावी आमदार तरी चालना देतील हीच सर्वसामान्य मतदार व नागरीकांची अपेक्षा.

## व्होट जिहादसारखे विषय जाणीवपूर्वक समोर आणतात - सचिन पायलट



**पुणे :** व्होट जिहाद किंवा व्होट धर्मयुद्ध असे विषय भाजप जाणीवपूर्वक समोर आणत आहे. सत्ताधारी पक्ष प्रथमच विरोधी पक्षावर आरोप करत आहे. भाजपने इलेक्ट्रोल बॉण्ड मध्ये

मोठा घोटाळा केला आहे ही बाब सर्वोच्च न्यायालयात देखील स्पष्ट झाली आहे, असे मत काँग्रेसचे राजस्थान मधील नेते सचिन पायलट यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

यावेळी अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस प्रवक्त्या शमा मोहंमद , काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे, अभय छाजेड, सौरभ अमराळे, मुख्तार शेख उपस्थित होते.

पायलट म्हणाले, महाराष्ट्र मधील विधानसभा निवडणुक ही देशाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. लोकसभा निवडणुकीत मतदार यांनी आघाडी सरकारला साथ दिली आहे. भाजपचा ४०० पार नारा भ्रम मतदारांनी उद्ध्वस्त केला. महाराष्ट्र मध्ये सिंचन योजना, शेतकरी आत्महत्या, महागाई, बेरोजगारी याबाबत चर्चा झाली पाहिजे. उत्तरप्रदेश मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ याठिकाणी येऊन चुकीच्या घोषणा देतात ही बाब त्यांचा पदाला शोभा देत नाही.

पायलट पुढे म्हणाले, दर निवडणुकीत भाजप पाकिस्तान विरोधात आणि धार्मिक मुद्दे समोर करत आहे. सोयाबीन, कापूस , कांदा यांना योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी मध्ये प्रचंड नाराजी आहे. गॅस सिलेंडर भाव वाढले असल्याने लोकांचे जीवन कठीण झाले आहे. मुख्य प्रश्नावरून लक्ष्य विचलित करण्यासाठी धार्मिक मुद्दे भाजप वारंवार पुढे करत आहे. चीन आज देशात घुसखोरी करत असून भाजपचे देशप्रेम उघड पडले आहे. काँग्रेस पक्ष देशात सर्वांना सोबत घेऊन काम करते आणि आपल्या विचारापासून कधी दूर जात नाही. जनतेला पारदर्शी सरकार हवे आहे.

## अशोक चव्हाणांचे पैसे घ्या पण मत काँग्रेसला द्या - रेवंत रेड्डी





**नांदेड :** अशोक चव्हाण यांचे मेहनतीचे पैसे नाहीत. त्यांचे पैसे घ्या पण मत कॉंग्रेसला द्या, असे म्हणत तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत अण्णा रेड्डी यांनी अशोक चव्हाण यांच्यावर टीका केली आहे. नांदेड येथील भोकर विधानसभा मतदारसंघात आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते.

रेवंत रेड्डी सभेत बोलताना म्हणाले, अशोक चव्हाण यांनी किती अमाप संपत्ती कमावली आहे हे त्यांनाही माहित नसेल. त्यांचे मेहनतीचे पैसे नाहीत. त्यांचे पैसे घ्या पण मत कॉंग्रेसच्या उमेदवारालाच करा. अशोक चव्हाण यांनी काही घाम गाळून पैसे कमावले नाहीत. त्यांच्या खिशातूनही पैसे काढून घ्या, ते ही कमी पडले तर त्यांच्या घरी जाऊन ज्या ज्या वस्तू आहेत त्यापण घेऊन टाका, असा सल्ला देखील त्यांनी दिला आहे.

पुढे बोलताना रेवंत रेड्डी म्हणाले, आता विधानसभा निवडणुकीत या गद्दारांना धडा शिकवायचा आहे. पैसे भेटतील दारू पाजतील. त्यांनी मेहनतीने पैसा कमावलेला नाहीये. घाम गाळून पैसा कमवलेला नाहीये. जितके पैसे दिले तितके घ्या, त्याच्या खिशात जे काय असेल ते पण घ्या, घरात जाऊन घरात काय असेल ते पण घ्या. कारण धोकेबाजाला धडा शिकवायचा आहे, पैसे देत असेल तर नकार देऊ नका.

खोटे बोलण्याची स्पर्धा लागली तर मोदी यांचा एक नंबर येईल, असा खोचक टोला रेवंत रेड्डी यांनी लगावला आहे. निवडणुकीत इमानदार उमेदवार जिंकणे महत्त्वाचे आहे. मोदींना पराभूत करायचे आहे, अशोक चव्हाण यांना हरवायचे आहे. राजकारणात अशोक चव्हाण दिसू नये कारण त्यांनी तुमचे नाव खूप खराब केले आहे, असेही रेवंत रेड्डी म्हणाले.

तेलंगणा सरकारबद्दल बोलताना रेवंत रेड्डी म्हणाले, तेलंगणा सरकारने दिलेल्या गॅरंटी पूर्ण केल्या. आम्ही कर्जमाफी केली, नोकऱ्या दिल्या. ५० हजार नोकऱ्या दिल्या, असे रेड्डी यांनी सांगितले. भाजपला आव्हान आहे, येऊन मोजा एक नोकरी जरी कमी दिसली तर मी जाहीर माफी मागेल, असे आव्हान रेवंत रेड्डी यांनी केले आहे.

पुढे बोलताना रेवंत रेड्डी म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या पाठीत खंजीर खुपसला, अजित पवारांनी शरद पवारांच्या पाठीत खंजीर खुपसला. ज्या कॉंग्रेसने अशोक चव्हाण यांना दोन वेळा मुख्यमंत्री बनवले त्यांनी कॉंग्रेसच्या पाठीत खंजीर खुपसला आहे, असे रेड्डी म्हणाले. तसेच हे सर्वजण मिळून महाराष्ट्राला गद्दारांचा अड्डा बनवत आहेत, असा टोला रेवंत रेड्डी यांनी लगावला आहे.

## मी मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत नाही - एकनाथ शिंदे



**मुंबई :** महाराष्ट्रात मतदानाच्या दोन दिवस आधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी आपण मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत नसल्याचे सांगितले. आज तकशी बोलताना ते म्हणाले की, मुख्यमंत्री महायुतीचाच होणार हेही निश्चित आहे. एक दिवसापूर्वी, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही एएनआयशी बोलताना असेच म्हटले होते.

मुख्यमंत्री शिंदे यांनी आज तकला सांगितले – काँग्रेसचे धोरण फोडा आणि राज्य करा. राहुल गांधी बाळासाहेब ठाकरे यांना हिंदुहृदयसम्राट कधी म्हणणार? शिंदे म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे म्हणायचे की मी माझ्या पक्षाची काँग्रेस कधीच होऊ देणार नाही, पण उद्धव ठाकरे स्वतःच्या स्वार्थासाठी आणि मुख्यमंत्री होण्यासाठी काँग्रेससोबत गेले. शिंदे यांनीही पंतप्रधान मोदींच्या 'एक हैं तो सेफ हैं' या घोषणेचे समर्थन केले.

२० नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा जागांसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. त्याचा निकाल २३ नोव्हेंबरला लागणार आहे.

फडणवीस यांनी १६ नोव्हेंबर रोजी एएनआयला दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते की, राष्ट्रवादीचे (एसपी) अध्यक्ष शरद पवार कुटुंब आणि पक्ष तोडण्यात माहिर आहेत. राष्ट्रवादी आणि शिवसेना त्यांच्या अतिमहत्त्वाकांक्षेमुळे तुटली.

उद्धव यांना मुख्यमंत्री व्हायचे होते म्हणून त्यांनी आमच्याशी संबंध तोडले. मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांना आदित्य ठाकरे यांना पुढे करायचे होते, म्हणून त्यांनी एकनाथ शिंदे यांना बाजूला सारण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १८ नोव्हेंबर २०२४


# जीवनानुभव समृद्ध करणारा दिवाळी अंक : अक्षरमुद्रा




प्रत्येक व्यक्ती आपलं जीवन अधिक सुसह्य, सुकर, आनंददायी आणि ताणतणाव विरहीत जगण्यासाठी जीवापाड प्रयत्न करीत असतो.त्याकरिता अनेक लोकांशी मैत्री, नातेसंबंध जोडतो.त्यांच्या आयुष्यात घडलेल्या घडामोडी, संकटे आणि त्यातून त्यांनी काढलेला मार्ग याचा आपल्या आयुष्यात उपयोगी पडेल म्हणून आपला अतिशय मौल्यवान वेळ, पैसा आणि श्रमशक्ती यासाठी वापर करतो.पण यातून बऱ्याच वेळा नैराश्य पदरी पडते.यातून बाहेर पडण्यासाठी आणि आपलं जीवन समृद्ध करण्यासाठी एक चांगला व सोपा उपाय सुप्रसिद्ध समीक्षक चंद्रकांत पाटील यांनी दिला आहे.ते एका लेखात नमूद केले आहे की,"एवढा वेळ,एवढी शक्ती आणि एवढी गुंतवणूक टाळायचे असेल तर दुसरा काय पर्याय आहे? वाचन करणं आणि त्यावर विचार करणं" पुन्हा आपल्यापुढे प्रश्न पडतो दररोज लाखो पुस्तके प्रकाशित होतात आणि आपणास मिळालेल्या मर्यादित आयुष्यात नेमकं काय वाचावं? आपल्याला कथा वाचावी वाटते, लेख वाचावा वाटतो, कविता ,कादंबरी, नाटक, चरित्र ग्रंथ, वैचारिक ग्रंथ... असं भरपूर काही वाचावं वाटते पण त्यातील नेमकं काय वाचावं असा प्रश्न पडत असतो . अशा समस्येतून सुटण्याचं काही प्रमाणात समाधान तुम्हाला "अक्षरमुद्रा" दिवाळी अंक नक्कीच देईल. प्रा. डॉ. दीपक चिद्दरवार मागील दोन-तीन वर्षांपासून अक्षरमुद्रा दिवाळी अंक काढत आहेत. ते एवढी मेहनत घेतात की वाटतं हा त्यांचा शेवटचा दिवाळी अंक आहे.पैसे देऊन लेख छापणाऱ्या काळात भरघोस मानधन देऊन, जाहिरातीची, अंकाच्या विक्रीची पर्वा न करता दर्जेदार दिवाळी अंक काढणं हे एका अर्थाने वेडेपणा आहे."प्रतिभावंत वेडे असतात" या लक्षार्थाने हा आमचा मित्र वेडा आहे.

सुप्रसिद्ध कवी भ. मा. परसावळे यांच्या कलात्मकतेतून साकारलेला सुंदर मुखपृष्ठ, सुप्रसिद्ध नाटककार दत्ता भगत यांची संपादकीय सल्लागार म्हणून मिळालेली मदत, सुप्रसिद्ध कवी,पी.विठ्ठल यांची उत्तम निवड केलेली कवितेचे संपादन आणि आशयानुरूप कु.इशा चिद्दरवार यांनी काढलेली रेखाटने वाचकांना आनंददायी अनुभूती देऊन जातात.ललित लेख, लेख, दीर्घकथा, मला प्रभावित केलेले पुस्तक, चरित्र लेख, व्यक्ती विशेष, आणि कविता अशा सात विभागात विभागलेला हा दिवाळी अंक वाचकांना कधी हसवितो, कधी रडवितो, कधी अस्वस्थ करून सोडतो, कधी विचार करायला भाग पाडतो तर कधी कधी या दिवाळी अंकाने आपले वाचन समृद्ध केले आहे या भावनेने तो उल्हसित होऊन जातो.एवढी ताकद या अंकात दडलेली आहे.

'ललित लेख' या विभागात वेगवेगळ्या विषयांवर सहा लेख समाविष्ट आहेत. अनिल जोशी,रविप्रकाश कुलकर्णी, सुरेंद्र पाटील, संजीवनी बोकील, गौरव जेवळीकर आणि अनघा जोशी यांनी लिहिलेल्या या लेखात वाचक लालित्यपूर्ण अनुभूती चाखायला लागतो. सचिन तेंडुलकर सर्वांना माहीत आहे पण त्यांचे वडील रमेश तेंडुलकर हे एक मोठे कवी होते हे किती वाचकांना माहीत आहे. यातील रमेश तेंडुलकर वरील लेख वाचताना वाचक अचंबित होऊन जातो. तर सुनिता दिक्कतवार, सुकल्प कारंजेकर, सुनीलकुमार लवटे, ज्योती कुलकर्णी, धनंजय गुडसूरकर आणि अतुल देऊळगावकर यांनी लिहिलेल्या लेखात निसर्ग, यंत्र, प्रकल्प, आरोग्य या वेगळ्या दुनियेत वाचक निघून जातो." मराठी भाषेतील लेखन इतर भाषांमध्ये पोहोचण्याचे प्रमाण कमी आहे. मात्र पाडळकरांचे साहित्य हिंदी भाषा मध्ये अनुवादित होत आहे या अनुवादित साहित्यानंतर 'हिंदी मे ऐसा क्यू लिखा नही जाता?' असा उपस्थित होणारा प्रश्न पाडळकरांच्या लेखणीची क्षमता सिद्ध करणारा तर आहेच पण मराठी साहित्याच्या गौरवात भर टाकणार आहे. 'हिंदुस्तान की हर भाषा को सिनेमा पर लिखने के लिए एक पाडलकर की जरूरत है' हे गुलजार यांचे उद्गार या दृष्टीने महत्त्वाचे ठरतात" (पृ.२३०) हे वाचताना सुप्रसिद्ध समीक्षक विजय पाडाळकर यांचे महत्त्व अधोरेखित होते. जगण्यातील गुंतागुंत, जीवनातील व्यामिश्रता, आयुष्यातील चढउतार, मनातील तरलता आणि माणूस समजून घेण्यासाठी अत्यंत प्रभावी पर्याय म्हणून यातील कथा विभागाकडे पाहता येईल. वृंदा दिवाण, रवींद्र लाखे,नफेसिंह कादयान अनुवादक दीपक चिद्दरवार, संजीव जिरासे, शंकर विभुते, लक्ष्मीकांत पेन्सलवार यांच्या कथा या कसोटीवर यशस्वी ठरलेल्या आहेत. "मी एकटी नाही रे. हा गाव, ही यांनी मी जोडलेली माणसे हाताचे काटे करून माझ्या भोवती उभे आहेत. रात्रंदिवस हे माझे आणि यांचे भाग्यच. हे अशा लहान गावात शक्य आहे. वहिनी म्हणाली"(पृ.२३) ही वृंदा दिवाण यांची 'प्रस्थान' कथा वाचताना शहर,खेडे, माणुसकी, भावनिक वलय आणि मनातील गुंतागुंत या बाबी वाचकांच्या डोळ्यासमोर उभे राहतात.

उसवण, गॉगल लावलेला घोडा, चकवा चांदण,लोभस, माणसं जिव्हाळ्याची, आईन्स्टाईन,द प्लेग,आयास,पेसोआ, कथा नायिकेच्या कथा,द लास्ट बॅलन्स,हिंद स्वराज, हिप्पोक्रेटिसची शपथ,माझे विद्यार्थी, भारतीय संस्कृती, दुसरं वादळ...ही फक्त पुस्तकांची नावे नाहीत तर इंद्रजित भालेराव, देविदास फुलारी, केशव देशमुख, सतीश बडवे... यासारख्या अतिशय प्रतिभावान व्यक्तिंना प्रभावित केलेली पुस्तके आहेत.जे एक पुस्तक सलग वाचायला किमान सहा तास लागतात (तसं काही वाचक एक पुस्तक एका महिन्यात वाचून पूर्ण करतात) अशा वेळी जर दोन ते तीन तासात सतरा ते अठरा पुस्तकांचा गाभा कळून जात असेल तर यापेक्षा वाचकांना दुसरी मोठी पर्वणी असू शकत नाही.ज्ञानदेव राऊत,पूनम छत्रे, अच्युत पदमावर, संजय आर्वीकर, महेश्वर लव्हेकर, मधुकर धर्मापुरीकर, दिलीप फलटणकर, संभाजी पाटील...ही सर्व लेखन करणारी लेखक मंडळी आहेत.यांनी ओळख करून दिलेला हा प्रभावित पुस्तकाचा विभाग संग्रही ठेवण्यासारखा झाला आहे. सुप्रसिद्ध समीक्षक डॉ.सुधीर रसाळ यांना समजून घेण्यासाठी कवी इंद्रजित भालेराव यांचा लेख मुळातून वाचण्यासारखा आहे.

'आजची कविता' या विभागात संपादन म्हणून कवी पी.विठ्ठल यांची भुमिका वाचकांना दिशा देणारी, कवितेचे मर्म उलगडून दाखवणारी आहे."कवी लिहितो म्हणजे नेमके काय करतो? तर तो जगण्याच्या प्रयोजनाचा तळ ठाव घेत असतो. पण त्याच्या निर्मितीला सार्वत्रिक मान्यता मिळेलच असे नाही. कारण माणसांचे वैचारिक विभाजन ही सुद्धा खूप सनातन आणि आदिम गोष्ट आहे"(पृ.१९६) या चिंतनातून त्यांनी निवडलेल्या जवळपास एकवीस प्रातिनिधिक कविता अतिशय महत्त्वाच्या आहेत.

" तुम्ही नागडे आहात असं म्हणाली माझी कविता म्हणजे नक्कीच तुम्ही तसे आहात कारण माझी कविता कधीही खोटं बोलत नाही"(पृ.२०५)ही डी.के.शेख यांची कविता खूप काही सांगून जाते. यासोबतच सुप्रसिद्ध नाटककार दत्ता भगत यांनी लिहिलेली तिसरी गोलमेज परिषद आणि भानू काळे यांची रामकृष्ण नायक हे दोन लेख आपण काही तरी एकदमच नवीन काही तरी वाचत आहोत ,ही अनुभूती वाचकांना येते.खर पाहता हा दिवाळी अंक प्रत्येक वाचकांनी अतिशय बारकाईने आणि संपूर्ण वाचण्याजोगे आहे.या लेखाच्या मर्यादा लक्षात घेऊन, या माध्यमातून अंकातील सर्व भागांना योग्य न्याय देणं शक्य नाही. पण वाचकांना किमान ओळख व्हावी आणि अंक घेऊन वाचण्याची आतुरता वाढावी या शुद्ध हेतूने हा लेखनप्रपंच आहे.या अंकाच्या वाचण्याच्या निमित्ताने आपले जीवनानुभव समृद्ध नक्कीच होईल यात काही शंका नाही.


**प्रा. डॉ. शंकर विभुते**
**मराठी विभागप्रमुख**
**पदवी व पदव्युत्तर विभाग**
**इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, नांदेड**
**भ्र. ७५८८०६८०५६**



**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**